| | | |
|---|---|---|
| स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, परभणी<br>जा.क्र /जिपप/साप्रवि/ **कार्यासन - ४**/कावि/४५२/२३. दिनांक :-१८/ ०६ /२०२३.<br>Email id - dyceogzppbn@gmail.com | जिल्हा परिषद परभणी |

वाचा :- १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.समय-२०१६/प्र.क्र.६२/१८ (र. व का.) दि. २४ फेब्रुवारी, २०२०.
२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.समय-२०१८/प्र.क्र.२३/२/१८ (र. व का.) दि. ३१ डिसेंबर, २०२०.

## परिपत्रक

प्रभावी व लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहण्यासाठी व त्यांच्या उपस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासन स्तरावरुन वेळो-वेळी मार्गदर्शक सुचना पारित करण्यात आलेल्या आहेत.

माझे असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत कार्यालयामध्ये काही ठिकाणी वर्ग - ३ मधील अधिकारी / कर्मचारी हे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत उपलब्ध होत नाहीत किंवा मुख्यालयाच्या ठिकाणी हजर राहत नाहीत. परिणामी ग्रामिण भागातुन येणा-या नागरीकांना कार्यालयात हेलपाटे मारण्याची वेळ येते व नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी विहित वेळेत शासकीय कार्यालयात उपस्थित राहुन कार्यालयीन कामकाज पार पाडणे आवश्यक असल्याने, त्यांचे उपस्थिती बाबात खातरजमा करण्याची जवाबदारी ही संबंधित आस्थापना शाखा प्रमुख / कार्यालय प्रमुख यांचेवर सोपविण्यात आलेली आहे. त्यामुळे आपले अधिनिस्त सर्व कार्यालय / विभागात कार्यरत असलेले सर्व अधिकारी / कर्मचारी हे कार्यालयीन वेळेत उपस्थित राहतात किंवा कसे ? याबाबत दैनंदिन अहवाल आपले स्तरावर अद्यावत ठेवण्यात यावा.

प्रकरणी आपले लक्ष संदर्भिय शासन निर्णयाकडे वेधन्यात येत असुन, ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेकडून कार्यालयीन वेळेचे वंधन पाळले जाणार नाही अशा अधिकारी / कर्मचा-यांची नियमा नुसार अनुपस्थिती ग्राह्य धरुन विना वेतन करण्यात यावे. तसेच एखादा अधिकारी / कर्मचारी कार्यालयीन वेळेचे बंधन पाळण्यास वारंवार कचुराई करीत असेल अशा कर्मचा-यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील तरतुदी नुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावीत करण्यात यावी.

सदर परिपत्रकाची सत्वर अंमलबजावणी व्हावी.

(व्हि.एस.मून)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद परभणी.**

प्रतिलिपी :-
१. सर्व विभाग प्रमुख ______________ जि. प. परभणी.
२. गट विकास अधिकारी पंचायत समिती ______________ जि. परभणी.

(व्हि.एस.मून)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद परभणी.**